दि.२६।१२।२०२२.

(१) म.टा.पान नं.०२.

# तुनिशा आत्महत्याप्रकरणी शीझानला अटक

म. टा. वृत्तसेवा, वसई



अभिनेत्री तुनिशा शर्माने वसईत एका मालिकेच्या सेटवर गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना शनिवारी घडली होती. या प्रकरणी तुनिशाच्या आईने पोलिसांकडे केलेल्या तक्रारीवरून तिचा सहकलाकार शीझान मोहम्मद खान याला शनिवारी रात्री उशिरा अटक करण्यात आली. आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या गुन्ह्याखाली त्याला अटक करण्यात आली असून रविवारी त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला ४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे .

## ४ दिवसांची पोलिस कोठडी

अभिनेत्री तुनिशा शर्मा सब टीव्हीवरील अलिबाबा दास्तान-ए-काबूल या मालिकेमध्ये मुख्य भूमिका साकारत होती. त्याचे चित्रीकरण वसई पूर्वेच्या सेटवर सुरू होते. शनिवारी शूटिंगला आल्यानंतर तिने तिच्या मेकअप रुमच्या बाथरुममध्ये गळफास घेतला. या प्रकरणी वालिव पोलिसांना माहिती दिल्यानंतर त्यांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला व पुढील तपास सुरु केला.

दरम्यान तुनिशाचे अभिनेता शीझान खान याच्याशी प्रेमसंबंध असल्याची माहिती तुनिषाच्या आईने दिली. तसेच १५ दिवसांआधी त्याने हे प्रेमसंबंध तोडल्याने ती निराश होती. त्यामुळे तिने आत्महत्या केली असे तिच्या आईने म्हटले आहे.

(२) म.टा.पान नं.०८.

# इमारतीचा स्लॅब कोसळला; ३५ जणांची सुखरूप सुटका



म. टा. वृत्तसेवा, वसई

नालासोपारा येथील एका धोकादायक इमारतीचा स्लॅब कोसळल्याची घटना रविवारी घडली. यात कोणतीही जीवितहानी झाली नाही, तर इमारतीत अडकलेल्या ३५ जणांची पालिकेच्या अग्निशमन दलाने सुखरूप सुटका केली.


नालासोपारा पूर्व येथील 'साईनिवास' या एक मजली धोकादायक इमारतीचा दरवाजाच्या समोरील स्लॅब अचानक कोसळला. यामुळे पहिल्या मजल्यावर असलेल्या २१ सदनिकांमध्ये ३५ रहिवासी अडकले होते. अग्निशमन दलाला तत्काळ पाचारण करून त्यांची सुखरूप सुटका करण्यात आली.

(३) लोकसत्ता पान नं.०२.

# 'नासुप्र'ची आणखी प्रकरणे लवकरच बाहेर

## जितेंद्र आव्हाड यांचा इशारा

लोकसत्ता प्रतिनिधी



नागपूर : नागपूर सुधार प्रन्यास (नागपूर इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट) भूखंड घोटाळा प्रकरणात अधिकाऱ्यांवर खापर फोडून व वाटप चुकीचे झाल्याची कबुली देत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भूखंड वाटप रद्द केले असले तरी कबुली दिल्याने गुन्ह्याचे गांभीर्य संपत नाही. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी नैतिकतेच्या मुद्द्यावर राजीनामाच द्यायला हवा, अशी मागणी राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केली. अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात 'नासुप्र'च्या भूखंडाचे आणखी काही प्रकरणे बाहेर काढू, असा इशाराही त्यांनी दिला.

आव्हाड यांनी रविवारी 'लोकसत्ता' कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांनी नासुप्र भूखंड घोटाळा व सध्याच्या राजकीय स्थितीवर भाष्य केले. ते म्हणाले, एखाद्या मंत्र्यावर किंवा मुख्यमंत्र्यांवर गैरव्यवहाराचा किंवा पदाचा गैरवापर केल्याचा आरोप झाल्यावर नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा देण्याची महाराष्ट्रात परंपरा राहिली आहे.

### जुने एकनाथ शिंदे हवेत...

एकनाथ शिंदे १९८५ पासून ठाण्याच्या राजकारणात आहेत. सर्वांना मदत करणारा व बरोबर घेऊन चालणारा नेता म्हणून त्यांची ओळख होती. मात्र मुख्यमंत्री झाल्यानंतर ते सुडाचे राजकारण करू लागले. या सुडाग्नीत ते स्वतः गुरफटत जातील. त्यामुळे आम्हाला जुनेच एकनाथ शिंदे हवे आहेत, त्यासाठी प्रार्थना करीत आहोत, असे आव्हाड म्हणाले.

याचे पालन शिंदे यांच्याकडून अपेक्षित आहे. नासुप्रच्या भूखंड वाटपाबाबत आव्हाड म्हणाले, नगरविकास खात्याचे मंत्री म्हणून शिंदे यांनी नासुप्रच्या १६ भूखंडांचे (ज्याचे बाजारमूल्य ८३ कोटी रुपये आहे) वाटप दोन कोटींना केले. न्यायालयाने ताशेरे ओढल्याने ते उघड झाले. त्यामुळे हे प्रकरण गंभीर आहे.

दि. २६/१२/२२.

(४) लोकसत्ता पान नं. ०५

## दिशा सालियनप्रकरणी आरोप

# आदित्य ठाकरे न्यायालयात जाण्याच्या तयारीत?

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** दिशा सालियन मृत्युप्रकरणी भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाच्या नेत्यांकडून होत असलेल्या आरोपांमुळे बदनामीबद्दल न्यायालयात जाण्याचा विचार शिवसेना नेते आदित्य ठाकरे करीत आहेत. याप्रकरणी त्यांना तुरुंगात पाठविण्याचा इशारा केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी दिला आहे.

सालियनप्रकरणी तपास करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष चौकशी पथक स्थापन करण्याची घोषणा केली आहे. केंद्रीय मंत्री नारायण राणे, आमदार नितेश राणे, शिंदे गटाचे खासदार राहुल शेवाळे यांच्यासह काही नेत्यांनी आदित्य ठाकरे यांच्यावर दिशा सालियन मृत्युप्रकरणी आरोप केले आहेत. त्यांच्या 'नार्को' चाचणीची मागणी केली आहे. शेवाळे यांनी रिया चक्रवर्तीला 'एयू' नावाने आलेले अनेक दूरध्वनी आदित्य ठाकरे यांचे होते, असे आरोप केले आहेत.



ठाकरे गटातील नेत्यांनी आरोपांना प्रत्युत्तर दिले असले तरी अब्रुनुकसानीबद्दल न्यायालयात दावा दाखल करता येईल का किंवा 'एसआयटी' चौकशीसह अन्य मुद्द्यांवर न्यायालयात जाता येईल का, याबाबत आदित्य ठाकरे कायदेशीर सल्ला घेत असल्याचे सूत्रांनी सांगितले. ठाकरे गटही आक्रमक झाला असून मुख्यमंत्री व राज्य सरकार विरोधात नागपूरमध्ये सोमवारी मोठा गौप्यस्फोट करण्याचे प्रत्युत्तर शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी दिले आहे. ठाण्यातील बांधकाम व्यावसायिक सूरज परमार आत्महत्याप्रकरणी त्यांच्या 'डायरी'तील सांकेतिक नावांची चौकशी करण्याची मागणी राऊत यांनी केली आहे.

(५) सकाळ पु. पान नं. ०७.

# ख्रिस्ती बांधवांकडून शांततेसाठी प्रार्थना

## वसईनगरीत नाताळचा उत्साह; येशू जन्मानिमित्त चर्चमध्ये मध्यरात्री घंटानाद

वसई, ता. २५ (बातमीदार) : वसई धर्म प्रांतातील सर्व चर्चमध्ये येशूचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी बायबलचे वाचन चर्चमध्ये करण्यात आले. नाताळनिमित्त प्रार्थनेसाठी मोठ्या प्रमाणात ख्रिस्ती बांधव एकत्र आले होते. चर्चमध्ये मध्यरात्री १२ वाजता घंटानाद करण्यात आला.

वसई धर्मप्रांताचे बिशप डॉ. फेलिक्स मच्याडो यांच्यासह सर्व चर्चमधून धर्मगुरूंनी नाताळनिमित्त प्रार्थना केली. यावेळी सुमारे ७० हजार ख्रिस्ती बांधवांनी सहभाग घेतला होता. येशूचा जन्मोत्सव साजरा झाल्यानंतर नाताळच्या पहिल्या दिवशी घरी तयार करण्यात येणारे केक, फराळ आदींचा मनमुराद आस्वाद घेण्यात आला. तसेच एकमेकांना शुभेच्छा देण्यात आल्या. येशूचा जन्म गोठ्यात झाला त्यामुळे प्रत्येक गावात ख्रिस्ती बांधवांनी गोठा तयार केला आहे. यातून जनजागृती संदेश देण्यात आले.



**वसई :** चर्चमध्ये येशू जन्मोत्सव ख्रिस्ती बांधवांनी साजरा केला.

### कुपारी संस्कृती महोत्सव

वसईतील सामवेदी ख्रिस्ती कुपारी संस्कृती मंडळातर्फे कुपारी संस्कृती महोत्सव सोमवारी (ता. २६) नालासोपारा वाघोली येथे सायंकाळी साडेचार वाजता होणार आहे. आगाशी चर्चचे रेव्ह. फा. फिलिप लोपीस यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या महोत्सवात २० हजारांहून अधिक सामवेदी ख्रिस्ती कुपारी समाजबांधव उपस्थित राहणार आहेत. यावेळी कुपारी खाद्य महोत्सव, दिंडी, वस्तू प्रदर्शन दालन तसेच कुपारी बँड या महोत्सवाचे आकर्षण असणार आहे.

दि. २६/१२/२२.

(क) पुढारी पान नं.०३.

# काशिमिरा येथे ऑर्केस्ट्रा बारवर कारवाई

## २० जणांवर गुन्हा दाखल : १२ जणांना अटक; सात मुलींची सुटका

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

काशीमिरा पोलीस ठाणे हद्दीतील पेनकरपाडा येथील हॉटेल नित्यानंद भवन (मंत्रा) ऑर्केस्ट्रा बारवर काशीमिरा पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत २० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यात सात सिंगर मुली, एक पुरुष वादक व एक मॅनेजर, एक कॅशिअर, दोन वेटर, पाच ग्राहक व ऑर्केस्ट्राच्या नावाखाली डान्स करणाऱ्या मुली व चालक मालक यांच्यावर कारवाई करून ५०८० रुपये रोख रकम जप्त करण्यात आली आहे. १२ जणांना अटक करून सात मुलींची सुटका केली आहे.

काशीमिरा पोलीस ठाणे हद्दीत अनेक बार अँड रेस्टॉरंट आहेत. यातील काही बार हे रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याचे दिसून येते. उशिरा चालणाऱ्या व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बारवर पोलिसांकडून कारवाई केली जाते. २५ डिसेंबर रोजी पहाटे साडे पाच वाजता नित्यानंद भवन अँड रेस्टॉरंट (मंत्रा बार) पेनकरपाडा येथील बार सुरू असल्याची माहिती मिळाली त्यावरून पोलिसांनी छापा टाकला असता त्या बारमध्ये सिंगर गाण्यावर अश्लील नृत्य करताना आढळून आले. त्या सिंगरच्या नावाखाली डान्स करणाऱ्या मुलींवर काही ग्राहक पैसे उधळताना दिसून आले. यावेळी ३०८० रोख रकम व २ हजार रुपये किमतीचे नकली नोटांचा गळयात घालण्याचा रोल मिळून आला.

(ख) पुढारी पान नं.०४.

# संपूर्ण महाराष्ट्रात सहकार पसरवण्यासाठी प्रयत्न करणार - सहकारमंत्री अतुल सावे



**वसई : पुढारी वृत्तसेवा**

सहकार हा पश्चिम महाराष्ट्रात जसा विस्तारला गेला, तसा तो संपूर्ण महाराष्ट्रात पसरण्यासाठी अणि त्याचा लाभ घराघरांमध्ये पोहोचला पाहिजे. यासाठी आपण कटाक्षाने लक्ष देणार असून, त्याच बरोबर महाराष्ट्रीयन युवकांनी मोठ्या प्रमाणात प्रशासनात येण्यासाठी एमपीएससी व यूपीएससी स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांसाठी जास्तीत जास्त सुविधा निर्माण करण्यावर आपला भर असेन, असे आश्वासन सहकार मंत्री ना. अतुल सावे यांनी वसईत बोलतांना दिले. देवतलाव येथील फा. बर्नड भंडारी सभागृहात सो.क्ष. समाज व वसई विकास सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने ना. अतुल सावे यांच्या सत्कारासाठी सोहळा आयोजित केला होता. त्यावेळी ते बोलत होते.

ना. सावे म्हणाले, मी सहकारमंत्री झाल्यानंतर हा माझ्या घरचा पहिलाच सत्कार आहे. त्यामुळे माझ्या कुटुंबीयांनीच माझ्या पाठीवर शाब्बासकीचा हात ठेवला आहे. त्याबद्दल मी आपल्या सर्वांचा ऋणी आहे. तसेच ओबीसींसाठीच्या योजना अणि त्यांचे प्रश्न लवकरच मार्गी लावणार, असेही ठोस आश्वासन त्यांनी यावेळी दिले. सहकारी संस्था, बँका व अन्य संस्था, तथा त्यांचे पदाधिकारी यांना रोजच्या कामकाजात सुसूत्रता यावी म्हणून सहकार क्षेत्राशी संबंधित आवश्यक त्या उपाययोजना व सहकार्य केलं जाईल, अशी ग्वाही ना. सावे यांनी यावेळी दिली.

दरम्यान, या सत्कार सोहळा कार्यक्रमाचे अध्यक्ष आ. हितेंद्र ठाकूर यांच्या हस्ते सहकार मंत्री अतुल सावे यांचा शाल श्रीफळ व सन्मान चिन्ह देत हृदयसत्कार करण्यात आला.

दि. २६।१२।२२.

७ पुढारी पान नं. ०४

# दया, क्षमा आणि शांती ही प्रतीके अंगीकारल्यास समाजात सुख-समाधान नांदेल- फादर मायकलजी

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

दया, क्षमा अणि शांती ही ईश्वराची प्रतीके सर्वांनी अंगीकारल्यास समाजात सुख-समाधान नांदेल. देशांत चाललेल्या प्रांत अणि जातीय अस्थिरतेमुळे विकासाची प्रक्रिया थंडावली असून, परस्परांना समजून घेण्याची आवश्यकता असल्याचे फादर मायकल जी यांनी यावेळी सांगितले. या पार्श्वभूमीवर सिस्टर सिंथिया बातीस्था यांच्या नेतृत्वाखाली अपंग सेवा संस्था संचालित अभंग भवन ही दिव्यांगाचे पुनर्वसन करणारी संस्था गेली सात वर्ष सर्वधर्मीय ख्रिस्तजयंती साजरी करून, सलोखा नांदावा म्हणून प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले. उमेळे येथील अभंग भवनतर्फे सालाबादप्रमाणे नाताळ निमित्त सर्वधर्मीय ख्रिस्तजयंती अणि बाल-यशु मिरवणूक सोहळा संपन्न झाला. समाजशुद्धी अभियानाचे अध्यक्ष, फादर मायकल जी बोलत होते.

विद्यार्थ्यांनी आई वडील अणि गुरुजनांची शिकवण आचरणात आणून, आभ्यासाच्या कठोर परिश्रमातून स्वतःचा उत्कर्ष साधावा. देश अणि राष्ट्राबद्दल प्रेम, तथा निष्ठा बाळगून, शिस्त अणि सुसंगतीतून आदर्श नागरिक बनावे, असा संदेश प्राचार्या एस. एल. वाझ यांनी आपल्या भाषणातून दिला. तसेच अभंग भवनच्या सर्वधर्मीय सलोख्याच्या या लक्षणीय उपक्रमामुळे आपण भारावून गेल्याचे त्या म्हणाल्या.

विद्यार्थी, पालक अणि शिक्षण संस्था यांच्यातील संवाद संपुष्टात आल्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या असल्याचे अलीकडे झालेल्या श्रद्धा वालकर हत्तेचा संदर्भ देवून ज्येष्ठ पत्रकार अनिलराज रोकडे यांनी सांगितले.

८ लोकमत पु. पान नं. ०२.

# 'क्रिप्टो ट्रेडिंग'ची पडली भूल, व्यवस्थापकाला गंडा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** हाँगकाँगमध्ये एका बँकेत क्रिप्टो ॲनालिस्ट आहोत, त्यामुळे क्रिप्टो ट्रेडिंगमधून मोठा फायदा करून देऊ शकते, अशी बतावणी करून एका अनोळखी महिलेने बँक व्यवस्थापकाला ६२ लाख १९ हजार रुपयांना ऑनलाइन गंडा घातल्याचे उघडकीस आले आहे. यांप्रकरणी शनिवारी नवघर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

मीरा रोडच्या फ्रॅग्रंस गार्डन सिटीत राहणारे गिरीशकुमार शुक्ल (४१) हे मुंबईच्या बीकेसी येथील एका खासगी बँकेत व्यवस्थापक आहेत. त्यांच्या व्हॉटस्ॲपवर परदेशी क्रमांकावरून एक मेसेज आला. त्यात प्रकाश तुम्ही माझी प्रवासाची व्यवस्था केली आहे का, त्यावर आपण प्रकाश नसल्याचे उत्तर शुक्ला यांनी दिले. आठवड्यानंतर पुन्हा त्या क्रमांकावरून संदेश आला. त्यात तिने स्वतःचे नाव झेंग मिया असून, हाँगकाँगमध्ये जेपी मॉर्गन चेस बँकेत क्रिप्टो ॲनालिस्ट म्हणून काम करीत असल्याचे नमूद केले. त्यानंतर दोघांत संभाषण वाढले. तिने क्रिप्टो ट्रेडिंग करण्यासाठी २०० डॉलरची



गुंतवणूक करण्याचा सल्ला दिला. तिने ट्रेडिंग शिकवण्याचे आश्वासनही दिले. त्यामुळे शुक्ला यांनी तयारी दर्शवली. त्यानंतर तिने एका ॲपवर खाते उघडून दिले आणि लिंक पाठवून ॲप डाउनलोड करण्यास सांगितले. तिच्यावर विश्वास ठेवून शुक्ला यांनी ट्रेडिंग सुरू केले. ट्रेडिंग केल्यानंतर ४४ लाख ३२ हजार रुपये जमा झाले. ही रक्कम काढायची असल्याचे शुक्ला यांनी त्या महिलेला सांगितले.

तिने त्यासाठी ३० टक्क्यांप्रमाणे १७ लाख ८० हजार रुपये टॅक्स भरावा लागेल, असे सांगितले. ती रक्कम शुक्ला यांनी भरली. मात्र, त्यानंतरही त्यांना त्यांचे पैसे काढता येत नव्हते. आपली फसवणूक झाल्याची त्यांना जाणीव झाली. त्यांनी याप्रकरणी भाईदरच्या नवघर पोलिस ठाण्यात १७ डिसेंबरला दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. २६/१२/२२.

(७) पुण्यनगरी पु. पान ०७

# नवघर पोलिसांनी केले तिघांना अटक

**मीरा रोड** : नवघर पोलीस ठाण्यात चोरीचे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल असलेल्या तीन आरोपींना



अटक करून त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त केला आहे.

प्रताप बेहरवानी यांचा ज्वेलरीचा व्यवसाय असून त्यांच्याकडे काही कामगार आहेत. त्यापैकी एक कामगार जितेंद्र असून त्याने १७ डिसेंबर रोजी फिर्यादीच्या कंपनीतून ६० ग्रॅम वजनाचे दीड लाख रुपये किमतीचे सोने चोरी केले होते. याबाबत नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. नवघर पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने तपास करून गुन्ह्यातील आरोपी जितेंद्र कांची पिल्ली याला २३ डिसेंबर रोजी नालासोपाऱ्यातून अटक केली आहे. पोलीस कोठडीदरम्यान तपास करून त्याच्याकडून दीड लाख रुपयांचे सोने जप्त केले.

दुसऱ्या घटनेत नरेश राजधर दुबे यांच्या भाईंदर येथील स्टीलच्या वस्तू बनवण्याच्या कारखान्यात १८ डिसेंबर रोजी अज्ञातांनी छताचे पत्रे तोडून २८५ किलो वजनाच्या ६० हजार रुपयांच्या स्टीलच्या वस्तू चोरल्या. याबाबत नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा रात्रीच्या वेळी घरफोडीचा असल्याने नवघर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपास करून आरोपी अजय विजय व्यास (१९) व आशिष लक्ष्मण वाघ (१९) यांना भाईंदर पश्चिम येथून २१ डिसेंबरला अटक केली. आरोपींकडे पोलीस कोठडीदरम्यान तपास करून गुन्ह्यातील चोरी केलेल्या २८५ किलो वजनाच्या ६० हजार रुपयांच्या स्टीलच्या वस्तू जप्त केल्या.

लोकमत

# आई, फेकून द्यायचे होते तर मला जन्म कशासाठी दिला?

## निष्पापांचा दोष काय? : अनैतिक-विवाहबाह्य सबंधांतून घडते कृत्य

**मंगेश कराळे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : 'मुलगाच हवा, मुलगी नकोच,' ही मानसिकता अद्यापही कमी झालेली नाही. त्यातच अनैतिक, विवाहबाह्य संबंधातून मुले जन्माला आली तर त्यांना मृत्यूच्या दाढेत ढकलण्याचे प्रमाण वाढत आहे. हातून घडलेले कुकर्म समाजाच्या नजरेत येऊ नये यासाठी टोकाचे पाऊल उचलले जाते. नाजूक कळ्या खुडण्याचे पापी कृत्य केले जाते. त्यामुळे 'आई, फेकून द्यायचे होते तर जन्म का दिला?' असाच सवाल या निष्पाप जिवांकडून केला जात असणार, एवढे मात्र नक्की.

मुलगी नको या भावनेतून तसेच अनैतिक संबंधातून जन्मलेल्या नवजात अर्भकांना रस्त्यावर फेकून देण्याचे धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. अशा प्रकारामुळे हिंसक पशू, प्राणी यांच्या चपाट्यात कितीतरी मुली-मुलं आली आणि त्यांना नाहक जीव गमवावा लागला अशा घटना घडलेल्या आहेत.



### अर्भक फेकून होतात आई-वडील पसार

१ मुले, मुली एकमेकांच्या प्रेमात पडतात. यात अल्पवयीनांचा मुला-मुलींचाही समावेश असतो. प्रेमामध्ये ते एकमेकांत गुंतले जातात. शारीरिक संबंधही त्यामध्ये येतो. त्यानंतर मुलगी गर्भवती राहते.

२ गर्भपात करण्यास गेल्यावर सर्वांना माहीत होईल या भीतीने गर्भ पोटामध्ये वाढवला जातो. बाळाला जन्म दिल्यानंतर काही तासातच त्याला फेकून दिले जाते. त्यानंतर आई-वडील पसार होतात.

### लाखमोलाचा जीव कचऱ्यात

मुलीच होत आहेत अशी ओरड समाजात नेहमीच होते. त्यातून महिलेलाच दोष दिला जातो. तिलाही कुटुंबात नाहक त्रास होतो. अशी कुटुंबेही कधी-कधी नवजात बाळांना रस्त्यावर, रानावनात, कचऱ्यात फेकण्याचा आग्रह धरतात.

### अर्भकांचे पुढे काय होते?

मयत अर्भकांचे विच्छेदन केले जाते. जिवंत अर्भकावर उपचार करून प्रकृती ठणठणीत होताच त्याला शिशुगृहात पाठवले जाते. पोलिसांकडून सर्व कायदेशीर बाबी पूर्ण केल्या जातात.

### दोन बेवारस अर्भक आढळले



पोलिस आयुक्तालयातील वसईत मागील ११ महिन्यांच्या कालावधीत आचोळ्यात एक पुरुष जातीचे व तुळींजमध्ये एक स्त्री जातीचे अशी दोन अर्भके बेवारस स्थितीत सापडली होती. दोन्ही ठिकाणी पोलिसांनी गुन्हे दाखल केले होते. त्या दोन्ही अर्भकांना वाचविण्यासाठी पोलिसांना यश आले आहे.

### पाळणाघरात ठेवावे, जीव तरी वाचेल

अनैतिक संबंधातून जन्मलेल्या बाळांना समाजाच्या भीतीने उकिरड्यावर, कचऱ्यात व निर्मनुष्य जागी सोडले जाते. ही घृणास्पद बाब असून त्याऐवजी त्यांना बालगृहात ठेवावे, तेथील पाळणाघरातही ठेवले जाऊ शकते. यामुळे निष्पाप बाळांचा जीव तरी वाचेल आणि गुन्हाही दाखल होणार नाही.

- **पूजा छेडा**, सामाजिक कार्यकर्ती

Hello Vasai
Page No. 3 Dec 26, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# १५ दिवसांपूर्वी अभिनेत्री तुनीषा शर्माचा ब्रेकअप


लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** नायगावच्या कामण येथे भजनलाल स्टुडिओत 'अलीबाबा - दास्तान ए काबूल' या मालिकेच्या सेटवरील रेस्ट रूममध्ये शनिवारी अभिनेत्री तुनीषा शर्माने आत्महत्या केली. मालिकेतील सहकलाकार शिजान खानवर तुनीषा प्रेम करत होती. १५ दिवसांपूर्वी शिजान खानने तिच्यासोबत ब्रेकअप केले व तिला सोडून दिले होते. याच नैराश्येतून तिने आत्महत्या केल्याची तक्रार तिच्या आईने वालीव पोलिसांत दिली आहे.

> या घटनेप्रकरणी गुन्हा दाखल करून आरोपी प्रियकराला अटक केली आहे. वसई न्यायालयाने आरोपीला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.
>
> \- **कैलाश बर्वे**, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वालीव पोलिस ठाणे

शनिवारी तुनीषा वॉश रूममध्ये गेली होती आणि बराच वेळ सेटवर आली नाही. त्यामुळे सेटवरील कर्मचाऱ्यांनी रेस्ट रूमचा दरवाजा तोडला तेव्हा ती गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आली.

## इन्स्टाग्रामवर १० लाख फॉलोअर्स



तुनीषाचे इन्स्टाग्रामवर १० लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत. ती सोशल नेटवर्किंग प्लॅटफॉर्मवर सक्रिय होती. मृत्यूच्या अवघ्या सहा तासांपूर्वी तिने इन्स्टाग्रामवर स्वतःचा एक फोटो पोस्ट केला होता.

## तुनीषा शर्माचे शवविच्छेदन

तिच्या पार्थिवाचे जे. जे. रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. यावर जे. जे. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय सुरासे यांनी सांगितले की, उत्तररात्री १.३० वाजता पोलिसांनी मृतदेह रुग्णालयात आणला. त्याच वेळी शवविच्छेदन प्रक्रियेला सुरुवात करून रविवारी पहाटे ४.३० वाजता शवविच्छेदन पूर्ण करण्यात आले. आता शवविच्छेदन अहवालाची प्रतीक्षा आहे.

Mumbai Main
Page No. 5 Dec 26, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

आहेत.

## आय विटनेस पोलिसांसमोर मांडले गाऱ्हाणे



आचोळे पोलिस ठाण्यात शनिवारी सकाळी तक्रार निवारण दिनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रकांत सरोदे यांनी तक्रारदारांचे म्हणणे ऐकून त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयातील सर्व पोलिस ठाणे स्तरावर प्रत्येक शनिवारी सकाळी दहा ते साडेअकरा या वेळेत तक्रार निवारण दिन राबविण्यात येणार आहे. (छाया : मंगेश कराळे)

Hello Vasai
Page No. 3 Dec 26, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# नायगाव पोलिस ठाण्याला २६ जानेवारीचा मुहूर्त?

## जागेअभावी पोलिस ठाणे रखडले

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाची स्थापना होऊन दोन वर्षांचा कालावधी उलटून गेला आहे. या कालावधीत प्रस्तावित तीन पोलिस ठाणी मार्गी लागली असताना नायगाव व बोळिंज ही दोन महत्त्वाची पोलिस ठाणी रखडली आहेत. यातील नायगाव या नव्या पोलिस ठाण्याला पुढील महिन्यात २६ जानेवारीला मुहूर्त मिळणार का? तत्कालीन पोलिस आयुक्त डॉ. सदानंद दाते यांची बदली झाल्याने त्यांच्या जागी आलेले आयुक्त मधुकर पांडे हे याकडे जातीने लक्ष घालतील का? याकडे वसईकरांचे लक्ष लागून आहे.

मागील महिन्यात नायगाव पोलिस ठाण्याची मुहूर्तमेढ रोवण्याची तयारी शासनाकडून सुरू होती. तशी माहिती काही पोलिस अधिकाऱ्यांकडून मिळाली होती. मात्र, जागेचा तिढा सुटत नसल्याने पोलिस ठाण्याचे काम रखडले आहे. तडीपार, गंभीर गुन्ह्यांतील गुन्हेगार नायगाव व परिसरात वास्तव्याला येतात. ते येथे येऊन आणखी गुन्हे करतात. मुंबई व बाहेर राज्यातील पोलिस या नायगाव विभागात सर्च ऑपरेशन करतात. अशा प्रसंगी नायगाव हे नवीन पोलिस ठाणे निर्माण होणे महत्त्वाचे ठरले आहे.

नायगाव पोलिस ठाणे होण्यासाठी आता वरिष्ठ अधिकाऱ्यांनीच पुढाकार घेत पर्यायी मार्ग निवडण्यासाठी पुढाकार घेतला आहे. येत्या २६ जानेवारी अर्थात प्रजासत्ताक दिनी या नव्या पोलिस ठाण्याचा शुभारंभ होत असल्याचे संकेत आता प्राप्त होत आहेत. नायगाव पोलिस ठाण्यासाठी काही पोलिस अंमलदारांच्या मागे पंधरा दिवसांपूर्वी नियुक्ती केल्या होत्या.

Hello Vasai
Page No. 2 Dec 26, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# हॉटेल व्यावसायिकाची लाखोंची फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : शांती पार्कच्या साईगणेश बिल्डिंगमध्ये राहणारे हॉटेल व्यावसायिक शशिधर शेट्टी (५७) यांची नोव्हेंबर २०२१ ते डिसेंबर २०२२ यादरम्यान लाखोंची फसवणूक झाली आहे. वालीव पोलिस ठाण्यात शनिवारी तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

शशिधर शेट्टी यांचे रेंज नाका येथे उडपी कृष्णा नावाचे हॉटेल आहे. येथे आरोपी मॅनेजर नितीन शेट्टी व लॉजिंग रिसेप्शनिस्ट शबिना खान या दोघांनी हॉटेलमधील अॅडव्हान्स बुकिंग होणारी रक्कम हॉटेलच्या बँक खात्यावर न घेता नितीनची पत्नी रेणुका शेट्टी यांचे गुगल व फोन पे अशा वेगवेगळ्या ऑनलाईन खात्यावर घेऊन ३५ लाखांचा अपहार केला. त्यापैकी २० लाख रुपये नोव्हेंबर अखेरपर्यंत परत केले. उर्वरित १५ लाख रुपयांची रक्कम आणण्यासाठी ५ डिसेंबरला कल्याण येथील घरी आरोपी गेला तो २२ डिसेंबरपर्यंत परत आलेला नाही. मोबाइल फोनवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला, पण मोबाइल बंद आहे. दोन्ही आरोपींनी १५ लाख रुपयांचा अपहार करून फसवणूक केली.

Hello Vasai
Page No. 1 Dec 26, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# सोन्याचे दागिने परत न करता फसवणूक

**नालासोपारा :** आगाशी रोडवरील पर्लस्टार सोसायटीत राहणारे श्रीहरी घाडीगांवकर (५२) यांची मुलगी प्रचिती हिची ऑगस्ट ते १६ डिसेंबर दरम्यान फसवणूक झाली आहे. तिचा मित्र आरोपी शुभम जाधव याने दुचाकी घ्यायची आहे. तसेच त्याचा मित्र आदित्य शिरसाट हा जेलमध्ये असून त्याला सोडवायचे आहे असे सांगून तिचा विश्वास संपादन केला. तिच्याकडून २६ ग्रॅमचा हार, १० ग्रॅमची चेन, १५ ग्रॅमचे मंगळसूत्र, ४ ग्रॅमचे कानातील पट्टी आणि ४० ग्रॅमच्या पाटल्या असे एकूण ४ लाख २७ हजारांचे सोन्याचे दागिने घेऊन परत देतो असे सांगितले होते. मात्र ते परत न करता फसवणूक केली आहे. अर्नाळा पोलिसांनी शनिवारी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Dec 26, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# जबरी चोरीसह मारहाण, गुन्हा दाखल



लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : अर्नाळ्याच्या मुक्कामपाडा येथे राहणाऱ्या जयदास (२९) या तरुणाचा मोबाइल हिसकावून त्याला जबर मारहाण झाल्याचा प्रकार घडला आहे.

२२ डिसेंबरला रात्री अर्नाळा बस डेपोजवळ तो दुचाकी लावून कामानिमित्त गेला. परत आल्यावर त्याला दुचाकी दिसली नाही, म्हणून तो आजूबाजूला शोध घेत होता. तेव्हा डेपोच्या बाहेर सन्नी यादवने (२७) जुन्या भांडणाचा राग मनात धरून दुचाकीच्या बॅटरीवरील कव्हर आणि नंबर प्लेट तोडत असल्याचे त्याला दिसले. सन्नीने त्याला शिवीगाळ व दमदाटी केली. वीट मारून, मारहाण करून दुखापत केली. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

Mumbai Main
Page No. 5 Dec 26, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# प्रेमात फसवणूक झाल्याने तुनीषाने संपवले जीवन?

## प्रियकर शिजान खानला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा/मुंबई :** टीव्ही मालिकेतील अभिनेत्री तुनीषा शर्माच्या (वय २४) आत्महत्येप्रकरणी तिचा सहकलाकार व प्रियकर शिजान खान याला वालीव पोलिसांनी अटक केली आहे. प्रेमात फसवणूक झाल्याने नैराश्यातून तुनीषाने स्वत:चे जीवन संपविल्याची तक्रार तिच्या आईने पोलिसांत दिली आहे.

शिजानविरोधात आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे. त्याला रविवारी वसई न्यायालयात हजर केल्यावर चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलिसांकडे अजूनपर्यंत कोणताही ठोस पुरावा हाती लागलेला नाही. या गुन्ह्याचा तपास सुरु असल्याची माहिति शिजानचे वकील शरद राव यांनी दिली. - **सबंधित वृत्त/३**



Mumbai Main
Page No. 3 Dec 26, 2022
Powered by: erelego.com

पुढारी

# काशिमिरा येथे ऑर्केस्ट्रा बारवर कारवाई

## २० जणांवर गुन्हा दाखल : १२ जणांना अटक; सात मुलींची सुटका

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

काशीमिरा पोलीस ठाणे हद्दीतील पेनकरपाडा येथील हॉटेल नित्यानंद भवन (मंत्रा) ऑर्केस्ट्रा बारवर काशीमिरा पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत २० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यात सात सिंगर मुली, एक पुरुष वादक व एक मॅनेजर, एक कॅशिअर, दोन वेटर, पाच ग्राहक व ऑर्केस्ट्राच्या नावाखाली डान्स करणाऱ्या मुली व चालक मालक यांच्यावर कारवाई करून ५०८० रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. १२ जणांना अटक करून सात मुलींची सुटका केली आहे.

काशीमिरा पोलीस ठाणे हद्दीत अनेक बार अँड रेस्टॉरंट आहेत. यातील काही बार हे रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याचे दिसून येते. उशिरा चालणाऱ्या व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बारवर पोलिसांकडून कारवाई केली जाते. २५ डिसेंबर रोजी पहाटे साडे पाच वाजता नित्यानंद भवन अँड रेस्टॉरंट (मंत्रा बार) पेनकरपाडा येथील बार सुरू असल्याची माहिती मिळाली त्यावरून पोलिसांनी छापा टाकला असता त्या बारमध्ये सिंगर गाण्यावर अश्लील नृत्य करताना आढळून आले. त्या सिंगरच्या नावाखाली डान्स करणाऱ्या मुलींवर काही ग्राहक पैसे उधळताना दिसून आले. यावेळी ३०८० रोख रक्कम व २ हजार रुपये किमतीचे नकली नोटांचा गळयात घालण्याचा रोल मिळून आला.

Thane Edition
Dec 26, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

पुण्य नगरी

# नवघर पोलिसांनी केले तिघांना अटक

**मीरा रोड :** नवघर पोलीस ठाण्यात चोरीचे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल असलेल्या तीन आरोपींना



अटक करून त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त केला आहे.

प्रताप बेहरवानी यांचा ज्वेलरीचा व्यवसाय असून त्यांच्याकडे काही कामगार आहेत. त्यापैकी एक कामगार जितेंद्र असून त्याने १७ डिसेंबर रोजी फिर्यादीच्या कंपनीतून ६० ग्रॅम वजनाचे दीड लाख रुपये किमतीचे सोने चोरी केले होते. याबाबत नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. नवघर पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने तपास करून गुन्ह्यातील आरोपी जितेंद्र कांची पिल्ली याला २३ डिसेंबर रोजी नालासोपाऱ्यातून अटक केली आहे. पोलीस कोठडीदरम्यान तपास करून त्याच्याकडून दीड लाख रुपयांचे सोने जप्त केले.

दुसऱ्या घटनेत नरेश राजधर दुबे यांच्या भाईंदर येथील स्टीलच्या वस्तू बनवण्याच्या कारखान्यात १८ डिसेंबर रोजी अज्ञातांनी छताचे पत्रे तोडून २८५ किलो वजनाच्या ६० हजार रुपयांच्या स्टीलच्या वस्तू चोरल्या. याबाबत नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा रात्रीच्या वेळी घरफोडीचा असल्याने नवघर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपास करून आरोपी अजय विजय व्यास (१९) व आशिष लक्ष्मण वाघ (१९) यांना भाईंदर पश्चिम येथून २१ डिसेंबरला अटक केली. आरोपींकडे पोलीस कोठडीदरम्यान तपास करून गुन्ह्यातील चोरी केलेल्या २८५ किलो वजनाच्या ६० हजार रुपयांच्या स्टीलच्या वस्तू जप्त केल्या.

Smart Mumbai Edition
Dec 26, 2022 Page No. 01
Powered by : eReleGo.com